# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांक:22.03.2024 वार:शुक्रवार

1.पंतप्रधान नरेंद्र मोदी भूतानच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर रवाना
2.दिल्ली मद्य धोरणाशी संबंधित कथित गैरव्यवहार प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सक्तवसुली संचालनालयाकडून अटक.
3.लोकसभा निवडणुकीसाठी कॉंग्रेसकडून ५७ उमेदवारांची यादी जाहीर. भाजपाचीही नऊ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर
4.पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत टेबल टेनिसपटू अचंता शरत कमल ,भारताचा ध्वजवाहक.
5.बेरूतमध्ये झालेल्या जागतिक टेबल टेनिस स्पर्धेत भारताच्या साथियान ज्ञानशेखरनला पुरुष एकेरीचं अजिंक्यपद

**मोदी रवाना**
पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवस भूतानच्या दौऱ्यावर आहेत. आज सकाळी ते या दौऱ्यासाठी रवाना झाले. या भेटीत मोदी भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्येल वांगचूक तसंच जिग्मे सिंग्ये वांगचूक यांची भेट घेणार आहेत. भूतानचे पंतप्रधान त्शेरिंग टॉबगे यांच्याशी ते चर्चा करणार आहेत.

**केजरीवाल अटक**
दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना काल सक्तवसुली संचालनालयानं म्हणजे ईडीनं अटक केली. दिल्ली मद्य धोरणाशी संबंधित ,कथित गैरव्यवहार प्रकरणी ईडीनं केजरीवाल यांना नऊ वेळा समन्स बजावलं होतं, तर हे समन्स बेकायदा आणि राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचं केजरीवाल यांनी म्हटलं होतं.

या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयानं काल, केजरीवाल यांना ईडीकडून कोणत्याही प्रकारच्या कारवाईविरुद्ध संरक्षण देण्यास नकार दिल्यानंतर, अटकेची कारवाई करण्यात आली. ईडीचं पथक काल संध्याकाळी केजरीवाल यांच्या निवासस्थानी दाखल झालं आणि त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

केजरीवाल यांच्या निवासस्थानाच्या परिसरात जमावबंदी लागू करण्यात आली आहे, तसंच सुरक्षाव्यवस्था वाढवण्यात आली आहे.
आम आदमी पक्षानं सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, या प्रकरणी तातडीनं सुनावणी घेण्याची मागणी केली आहे. ही अटक चुकीची आणि घटनाबाह्य असल्याची टीका कॉंग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी-वड्रा यांनी केली आहे. निवडणुकीमुळे ही अटक केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. हे प्रकरण भ्रष्टाचाराविरुद्धच्या, कायदेशीर प्रकियेचा भाग असल्याचं भाजपाचे वरिष्ठ नेते रविशंकर प्रसाद यांनी म्हटलं आहे.

**कॉंग्रेस यादी**
कॉंग्रेसनं काल लोकसभेसाठी ५७ उमेदवारांची यादी जाहीर केली. अरुणाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री नबाम टुकी हे अरुणाचल पश्चिम मतदारसंघातून उभे राहणार आहेत, तर पुदुच्चेरीचे माजी मुख्यमंत्री वैथिलिंगम, पुदुच्चेरी मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवणार आहेत. लोकसभेतील कॉंग्रेसचे गटनेते अधीररंजन चौधरी ,पश्चिम बंगालमधल्या बेहरामपूर मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

**काँग्रेस**
काँग्रेसच्या या यादीत महाराष्ट्रातून सात जणांच्या नावांचा समावेश आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून रविंद्र धंगेकर, लातूरमध्ये शिवाजीराव काळगे, सोलापूरमध्ये प्रणिती शिंदे, कोल्हापूरमध्ये छत्रपती शाहू महाराज, नंदूरबारमध्ये गोवल पाडवी, अमरावतीमध्ये बळवंत वानखेडे, तर नांदेड लोकसभा मतदारसंघातून वसंतराव चव्हाण यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.
दरम्यान, भारतीय जनता पार्टीनंही आपली तिसरी यादी काल जाहीर केली. त्यात नऊ उमेदवारांचा समावेश आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन हे निलगिरीस मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत, तर तेलंगणचे माजी राज्यपाल तमिलसाई सौंदरराजन, चेन्नई दक्षिण मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. तमिळनाडू भाजपाचे अध्यक्ष के. अन्नामलाई यांना कोईमतूर मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपानं यापूर्वी आपल्या २६७ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

**निवडणूकरोखे**
निवडणूक आयोगानं काल निवडणूक रोख्यांचा तपशील आपल्या संकेतस्थळावर प्रकाशित केला. निधी देणाऱ्यांची आणि निधी स्वीकारणाऱ्यांची स्वतंत्र यादी आयोगानं जाहीर केली आहे. यामुळे कोणत्या राजकीय पक्षाला कोणत्या व्यक्तीकडून निधी मिळाला हे तपासण्यात मदत होईल.

भारतीय स्टेट बँकेनं काल सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी प्रतिज्ञापत्र दाखल केलं. आकडेवारीसह निवडणूक रोख्यांबाबतचे सर्व तपशील निवडणूक आयोगाकडे सादर केल्याचं बँकेनं या प्रतिज्ञापत्रात म्हटलं आहे. यानंतर निवडणूक आयोगानं निवडणूक रोख्यांचा तपशील संकेतस्थळावर प्रकाशित केला. रोख्यांची विक्री करण्यासाठी या एकाच बँकेची नियुक्ती करण्यात आली होती. मार्च २०१८मध्ये या रोख्यांची विक्री सुरू झाली आणि सर्वोच्च न्यायालयानं गेल्या महिन्यात बंदी घालेपर्यंत ही विक्री सुरू होती.

**सर्वोच्चन्यायालय**

सर्वोच्च न्यायालयानं मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसंदर्भातल्या नव्या कायद्याला स्थगिती द्यायला नकार दिला आहे. लोकसभा निवडणुका तोंडावर आल्या असताना या कायद्याला स्थगिती देऊ शकत नाही असं न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्त यांच्या खंडपीठानं काल स्पष्ट केलं. निवडणूक आयुक्तांच्या निवड समितीचे सदस्य कोण असावेत याबद्दल राज्यघटनेत कोणतेही नियम सांगितलेले नाहीत. तसंच ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू या नव्यानं नेमणूक झालेल्या निवडणूक आयुक्तांबाबत कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

**जल दिन**

आज जागतिक जल दिन आहे. पाण्याच्या बचतीसाठी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्र संघानं १९९२ मध्ये झालेल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. सर्वसाधारणपणे २२ मार्चपासून वातावरण बदलायला सुरुवात होते. तात्विकदृष्ट्या पावसाळ्याची सुरुवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो म्हणून संयुक्त राष्ट्र संघानं जागतिक जल दिनासाठी २२ मार्चची निवड केली. शांततेसाठी पाणी ही यंदाच्या जल दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

**ऑपरेशन इंद्रावत**

भारतानं हैतीमधून भारतीय नागरिकांना डॉमिनिक प्रजासत्ताकामध्ये आणण्यासाठी ऑपरेशन इंद्रावती सुरू केलं आहे. परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे. काल बारा भारतीयांना हैतीमधून बाहेर काढण्यात आलं. परदेशांमध्ये असणाऱ्या भारतीयांच्या सुरक्षेबाबत केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. डॉमिनिक प्रजासत्ताकाचेही त्यांनी आभार मानले आहेत.

**एनआयए**

राष्ट्रीय गुप्तचर संस्था म्हणजे एनआयएनं तीन जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केलं आहे. आयसिस या दहशतवादी संघटनेसाठी निधी गोळा करणं आणि स्फोटकांबाबत कट करणं यांच्याशी या तिघांचा संबंध असल्याचं एआयएनं म्हटलं आहे. दिल्लीतल्या पतियाळा न्यायालयात हे आरोपपत्र दाखल करण्या आलं आहे.

**परीक्षा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीनं येत्या २८ एप्रिल रोजी होणारी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा तसंच १९ मे रोजी होणारी समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या परीक्षांच्या सुधारित तारखा यथावकाश जाहीर करण्यात येणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

**अचंता कमल**

टेबल टेनिसपटू अचंता शरत कमल हा पॅरिसमध्ये या वर्षी होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेत भारताचा ध्वजवाहक असेल, अशी घोषणा भारतीय ऑलिंपिक संघटनेनं केली आहे. मुष्टियोद्धापटू मेरी कोम पथकाची प्रमुख असेल, तर लुग या खेळातील खेळाडू शिवा केशवन उपप्रमुख असेल. गगन नारंग नेमबाजीच्या पथकाचं नेतृत्व करणार आहे.

**स्विस बॅडमिंटन**

स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे किदांबी श्रीकांत, प्रियांशू राजावत आणि किरण जॉर्ज यांनी पुरुषांच्या एकेरी गटात उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. श्रीकांतनं मलेशियाच्या ली झी जियाचा पराभव केला, तर किरण जॉर्जनं फ्रान्सच्या ऍलेक्स लेनिअरचा पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. प्रियांशू राजावतनं चीनच्या लेई लँक्सीला पराभूत केलं. भारताच्या लक्ष्य सेनला मात्र तैवानच्या ली चिया-हाओकडून पराभव पत्करावा लागला.

या स्पर्धेत भारताच्या गायत्री गोपीचंद आणि ट्रीसा जॉली यांनीही महिला दुहेरी गटात उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. दुसऱ्या एका सामन्यात भारताच्या तनिषा क्रास्टो आणि अश्विनी पोनप्पा यांनी सोळाव्या फेरीत जपानच्या आर. हिरोकामिना आणि वाय. काटो यांचा पराभव केला.

**कबड्डी**

अहमदनगर इथं काल सत्तराव्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेला प्रारंभ झाला. काल झालेल्या सामन्यात महाराष्ट्रासह, गतविजेते भारतीय रेल्वे, गोवा, हरियाणा यांनी विजयी सलामी दिली. या स्पर्धेचं उद्घाटन अर्जुन पुरस्कार प्राप्त कबड्डीपटू अशोक शिंदे यांच्या हस्ते करण्यात आलं. चार दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील ३० संघ सहभागी झाले आहेत.
ब गटाच्या सामन्यात काल यजमान महाराष्ट्रानं गुजरातला ४८ विरुद्ध ३१ गुणांनी पराभूत केलं. महाराष्ट्रानं ९ बोनस गुण मिळविले. अ गटात भारतीय रेल्वेनं बीएसएनएल संघाचा ४० विरुद्ध ७ गुण असा धुव्वा उडविला. क गटात गोव्यानं बंगालला तर ड गटात हरियाणानं उत्तराखंडला पराभूत केलं.

**टेबल टेनिस**

टेबल टेनिसमध्ये डब्ल्यूटीटी बेरुत स्पर्धेत भारताच्या साथियान ज्ञानशेखरन यानं पुरुषांच्या एकेरी गटात अजिंक्यपद पटकावलं आहे. साथियाननं भारताच्याच मनव ठक्करचा ६-११,११-७,११-७,११-४ असा पराभव करून हे अजिंक्यपद पटकावलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.